# महाराष्ट्र विधानपरिषद
# दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शुक्रवार, दिनांक २५ मार्च, २०२२
## (सकाळी १०.०० ते ११.४५ वाजेपर्यंत)

**म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

**(गुरुवार, दिनांक २४ मार्च, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) – [अनुक्रमांक (१) व (२)] –**

(१) **सर्वश्री शशिकांत शिंदे,** अमोल मिटकरी, संजय दौंड, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"केंद्र शासनाने संपूर्ण भारतभर कृषि धोरण राबविण्याच्या निमित्ताने ३ कृषि कायदे पारित केले असून या कृषि कायद्यांना देशातील अनेक शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला होता. तर काही राज्यांनी हा कायदा लागू केलेला नसणे, सदरील कृषि कायदे रद्द करण्याचा निर्णय केंद्र शासनाकडून घेण्यात येणे, परंतु अद्याप महाराष्ट्र राज्यामध्ये सदरील कृषि कायदे रद्द केल्याबाबत कोणतीही अंमलबजावणी करण्यात आलेली नसणे, या रद्द केलेल्या कृषि कायद्याचा अधिकार पणन विभाग किंवा राज्यातील बाजार समितीकडे देखील देण्यात आलेला नसणे, मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती आवारामध्ये अन्नधान्य, मसाला, भाजीपाला, फळे व कांदा बटाटा अशी मार्केट असणे, केंद्र शासनाचा कृषि कायद्याची अंमलबजावणी करण्याचे निमित्ताने महाराष्ट्र राज्याच्या पणन खात्याने वेळोवेळी अनेक कायदे, नियम व निर्णय घेतलेले असणे, सदरील केंद्राचा हा कृषि कायदा रद्द झाल्याने राज्याच्या पणन विभागाने वेळोवेळी या कायद्याच्या अनुषंगाने घेतलेला निर्णय रद्द करणे गरजेचे असणे, त्याअनुषंगाने आजमितीपर्यंत मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीच्या पाचही मार्केटमध्ये अनेक वस्तुवर बाजार समितीच्या नियमानातून सुट दिलेली असणे, त्यामुळे बाजार समितीच्या आवारातील व्यापारी, कामगार व इतर सर्व घटकांवर त्याचा फार विपरीत परिणाम झालेला असणे, सुकामेवा, साखर, डाळी, खादयतेल हे सन २०१३ पासून नियमन मुक्त करण्यात आले असणे, या वस्तु थेट शेतकऱ्यांकडून येत नसल्यामुळे शेतकऱ्यांचा काही संबंध येत नसणे, त्यामुळे बाजार समितीला त्याचा सेस मिळत नसल्यामुळे याचा बाजार समितीच्या व्यवसायावर परिणाम होत असणे, परिणामी माथाडी कामगारांच्या मजुरीवर त्याचा परिणाम होत असणे, केंद्र शासनाकडून पारित केलेला कृषि कायदा रद्द केल्यानंतर तो आपल्या

अप्रकाशित प्रत

राज्य शासनाकडून रद्द करुन राज्यातील बाजार समितीमधील कामगार, व्यापारी व इतर घटकांना न्याय देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री विनायक मेटे,** निलय नाईक, रणजितसिंह मोहिते-पाटील, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"महाराष्ट्रामध्ये मराठा समाजाचे तसेच ओबीसी समाजाचे राजकीय आरक्षण रद्द होणे, मराठा समाजास आरक्षण मिळण्यासाठी शासनाने राज्य मागास वर्ग आयोगाकडे सदरील विषय सोपविण्याची व पूर्ण सर्वेक्षण करुन योग्य अहवाल शासनास देण्याची निर्माण झालेली आवश्यकता, आताचे राज्य मागासवर्ग आयोग बरखास्त करुन त्या ठिकाणी नवीन आयोग नेमण्याची निर्माण झालेली परिस्थिती, याबाबत शासनाने त्वरीत निर्णय घेण्याची आवश्यकता, ओबीसी राजकीय आरक्षण संदर्भात इंपिरिकल डाटा संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने निर्देश देणे, त्यानुसार सर्मपित आयोग गठीत करण्याची अत्यंत आवश्यकता असणे, शासनस्तरावर याबाबत गंभीरपणे कार्यवाही न करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## (दुपारी १२-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे —**

**(क)** शुक्रवार, दिनांक ११ मार्च, २०२२ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला डॉ.सुधीर तांबे व इतर वि.प.स. यांचा "राज्यातील शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक १२६०३

**(ख)** तारांकित प्रश्न

**(ग)** अतारांकित प्रश्नोत्तरांची एकविसावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

(१) **उप मुख्यमंत्री** : **(क)** "भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचा अनुपालन अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

अप्रकाशित प्रत

(ख) "लिंगभाव अर्थसंकल्प विवरणपत्र (Gender Budget Statement) व बाल अर्थसंकल्प विवरणपत्र (Child Budget Statement) २०२२-२०२३ हे प्रकाशन" सभागृहासमोर ठेवतील.

(२) **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** : **"चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात विविध साथीच्या आजारांची झालेली लागण"** या विषयाबाबत **श्रीमती शोभा फडणवीस माजी व इतर वि.प.स.** यांनी म.वि.प. नियम १०१ अन्वये दिलेल्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्यावेळी **डॉ.निलम गोऱ्हे वि.प.स.** यांनी उपस्थित केलेल्या **"महाराष्ट्रात अनेक रुग्णालयात सी.टी. स्कॅन, एक्स रे मशीन नादुरुस्त अवस्थेत आहेत."** या मुद्यासंदर्भात दिनांक ११ जुलै, २०१२ रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

(३) **अल्पसंख्याक विकास मंत्री** : "महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग यांचे सन २०१३-२०१४, सन २०१४-२०१५ व सन २०१५-२०१६ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : "पंचायती राज समितीचा अकरावा, बारावा, तेरावा व चौदावा अहवाल सादर करणे."**

**चार : "विधानपरिषदेने संमत केलेल्या विधेयकांना विधानसभेची संमती व दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याचे जाहीर करण्यात येईल."**

**पाच : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

(१) **सर्वश्री प्रविण दरेकर,** विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ. परिणय फुके, सर्वश्री सुरेश धस, सदाशिव खोत, प्रसाद लाड, गोपिचंद पडळकर, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री विनायक मेटे, नागोराव गाणार, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री निलय नाईक, रमेशदादा पाटील, प्रवीण दटके, चंदूभाई पटेल, **वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक १८ वर सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** निवेदन करतील :-

अप्रकाशित प्रत

"ठाणे, पालघर जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाची कामे केलेल्या जिजाऊ कन्स्ट्रक्शन कंपनी, ठाणे या कंपनीच्या कामांची गुणवत्ता तपासणी पथकामार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी."

(२) **श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक १९** वर **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** निवेदन करतील :-

"राज्यातील वाढती स्त्रीभ्रूण हत्या रोखण्याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, या संदर्भातील प्रकरणांचा तपास जलदगतीने करून गुन्हेगारांवर कारवाई करण्याबाबत."

**सहा : (क) लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(गुरुवार, दिनांक २४ मार्च, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१)] —**

(१) **श्री.विनायक मेटे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृहनिर्माण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई मधील वर्सोवा भागातील आरामनगर नावाची म्हाडाची वसाहत असणे, सदरील वसाहत अनेक वर्षांपासूनची असल्यामुळे तिचे पुर्नविकास करणे आवश्यक झालेले असणे, त्या अनुषंगाने आरामनगरच्या स्थानिक असोसिएशनने RNA Construction या विकासाबरोबर सन २००७-२००८ मध्ये करारनामा करणे, त्यानंतर विकासक, स्थानिक असोसिएशन व म्हाडा असा त्रिपक्षीय करार होणे, करार होऊनही आजतागायत १५ वर्षानंतरही आरामनगर वसाहतीच्या पुर्नविकासाबाबत कोणतीही हालचाल विकासकाकडून होत नसणे, यामुळे स्थानिक रहिवाश्यांना मोठा त्रास सहन करावा लागणे, यामुळे काही स्थानिक रहिवाश्यांकडून वेगळया विकासकाबरोबर बोलणी सुरू करण्यात येणे, यामध्ये सर्व स्थानिक रहिवाश्यांना विश्वासात न घेणे, नविन विकासकाबरोबर स्थानिक रहिवाश्यांनी करारनामा करावा म्हणून दडपशाही करणे, स्थानिक प्रशासनाचा वापर करून घेणे, यामुळे स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होणे, स्थानिक रहिवाश्यांना आपल्या हक्काचे घर मिळावे यासाठी लवकरात लवकर सदरील वसाहतीचा पुर्नविकास व्हावा, याकरीता म्हाडाने पुढाकार घ्यावा व मुंबईमध्ये काही ठिकाणी अनेक वसाहतींचे म्हाडांनी पुर्नविकास करण्याच्या घेतलेल्या निर्णयासारखाच निर्णय म्हाडाने आरामनगर वसाहतीबाबत घेण्याची आवश्यकता, त्याकरिता काही लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी, याबाबत स्थानिकांमध्ये असंतोष निर्माण होणे, याबाबत शासनाने

अग्रिम प्रत

केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री.अरुण लाड**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शासनाच्या २९ प्रमुख विभागांमध्ये सरळसेवा व पदोन्नतीच्या मिळून तब्बल दोन लाख १९३ जागा रिक्त असून त्यात तब्बल ४६ हजार ९६२ जागा जिल्हा परिषदांमधील असणे, रिक्त पदांमुळे नागरिकांना मिळणाऱ्या शासकीय सेवा प्रभावित होत असून तहसिल कार्यालयात साध्या उत्पन्नाच्या दाखल्यासाठीही विद्यार्थी व पालकांना किमान दोन आठवडे प्रतिक्षा करावी लागत असणे, राज्यात बेरोजगारी प्रचंड वाढली असून तरुणांना नोकऱ्यांची प्रतिक्षा असणे, मात्र शासनाच्या नव्या नोकरभरती ऐवजी आऊटसोर्सिंग,कंत्राटी पध्दतीवर अधिक जोर असल्याचे दिसून येणे, त्यातूनच निवृत्तांना पुन्हा कंत्राटी तत्वावर सेवेत सामावून घेतले जात असणे, सदरची माहिती ही फक्त राज्यातील शासकीय विभागांची व जिल्हा परिषदांमधील अधिकारी/कर्मचारी यासंदर्भातील असणे, तथापि त्यामध्ये नगरपंचायती, नगरपरिषदा, महानगरपालिका, शासन अधिनस्थ मंडळे व महामंडळे, उद्योग व इतर विभागातील माहिती समाविष्ट केली नसल्याचे निदर्शनास येणे, सरळसेवा भरतीबाबतही राज्य लोकसेवा आयोगाची संथगती दिसून येत असल्यामुळे सहाजिकच कॉललेटर, प्रशिक्षण, परिवीक्षाधीन कालावधी याला बराच वेळ लागत असणे, राज्यातील बेरोजगारांची वाढलेली संख्या विचारांत घेतां, शासनाने नोकरीच्या संधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करणे गरजेचे असणे व त्यासाठी शासनस्तरावर रिक्त असलेली पदे भरण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची वा केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री.नरेंद्र दराडे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शिर्डी साईबाबा संस्थान (जि.अहमदनगर) येथील श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयांमध्ये औषध खरेदीमध्ये अनियमितता व गैरव्यवहार होत असणे, सदर रुग्णालयात वैद्यकीय साहित्य व औषधे खरेदीबाबत संस्थेकडून १०० टक्के औषध खरेदीची ऑर्डर देण्यात आलेली असतानाही संबंधित अधिकारी काही पुरवठादार कंपनीकडून केवळ ३० टक्केच औषध मागवत असणे, परिणामी रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना बाहेरुन औषधे खरेदी करावी लागणे, त्यामुळे त्यांची होणारी आर्थिक पिळवणूक, अद्यापही

अप्रकाशित प्रत

या अनियमिततेप्रकरणी ऑडिट करण्यात न येणे, शासनाने याप्रकरणी तातडीने चौकशी करुन वैद्यकीय साहित्य खरेदी व औषध खरेदीमध्ये अनियमितता व गैरव्यवहार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री अनिकेत तटकरे,** शशिकांत शिंदे, विक्रम काळे, सतिश चव्हाण, अमोल मिटकरी, संजय दौंड, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदावर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूल विभाग वाटप नियम २०२१ या अधिसूचनेमध्ये पूर्वीच्या महसूल विभाग वाटप नियम २१५ मधील नियम १२ मधील १२ (ब) पती-पत्नी एकत्रिकरण व १२ (क) आपसात महसूल विभाग बदलणे ही तरतूद काढून टाकण्यात आलेली असणे, ही बाब शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या आणि ज्यांचे पती शासकीय सेवेत आहेत अशा सर्व महिला अधिकारी-कर्मचारी यांच्यावर अन्याय करणारी व त्यांना नोकरीपासून परावृत्त करणारी असणे, पती-पत्नी एकत्रिकरणाची तरतूद काढून टाकल्यामुळे अनेक महिलांना याचा नाहक त्रास होणे, पुरुष व महिला यांच्या नोकऱ्या आणि संसार उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर असणे, ही बाब महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यासाठी अतिशय गंभीर असून शासनाच्या महिला सबलीकरण धोरणास बाधा आणणारी असणे, प्रतिभावंत व कर्तृत्ववान महिलांचे राज्य प्रशासनातील प्रमाण वाढते रहावे याकरिता त्यांच्या कौटुंबिक आरोग्यविषयक स्वास्थाकरीता राज्य शासनाने वेळोवेळी सवलत देण्याचे स्तुत्य धोरण यापूर्वी देखील अवलंबिले असणे आणि त्याच अनुषंगाने २०१५ च्या अधिनियमांमध्ये पती-पत्नी एकत्रिकरणाची तरतूद करण्यात आलेली असणे, त्यानुषंगाने शासकीय सेवेत कार्यरत पती-पत्नी एकत्रित ठेवण्याच्या धोरणानुसार १९९७ सालापासून महिला सबलीकरणासाठी अस्तित्वात असलेली व २०१५ च्या अधिसूचनेत नियम १२ मधील (i) व (ii) या जाचक अटी रद्द करण्याच्या सुधारणेसह २०२१ च्या नवीन अधिसूचनेतील नियम १२ मधील १२ (ब) पती-पत्नी एकत्रिकरण व १२ (क) आपसात महसूल विभाग बदलणे या तरतुदी समाविष्ट करण्याकरीता अधिकारी-कर्मचारी वर्गाकडून होत असलेली आग्रही मागणी तथापि त्याबाबत शासनाने कार्यवाही न करणे, परिणामी अधिकारी-कर्मचारी यांच्यामध्ये निर्माण झालेले नैराश्याचे वातावरण, त्याबाबत शासनाने

अमुद्रित प्रत

करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **श्री.चंद्रशेखर बावनकुळे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **खनिकर्म मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील जिल्हा खनिज प्रतिष्ठान संदर्भात दिनांक २३ एप्रिल २०२१ ला केन्द्रीय खाण व खणन मंत्रालयाने दिलेल्या आदेशानुसार संबंधित जिल्हाधिकारी हा प्रतिष्ठानचा अध्यक्ष राहणार असून जिल्ह्यातील खासदार, राज्यसभा सदस्य, विधानसभा व विधान परिषद सदस्य हे सर्व सदस्य राहतील व त्यांच्या सुचनेनुसार प्राप्त निधीचे वाटप करण्याबाबत स्पष्ट आदेश दिलेला असणे, या आदेशानुसार राज्य शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाने दिनांक ६ डिसेंबर २०२१ ला राजपत्रिय अधिसूचना प्रकाशित करून नवीन खनिज प्रतिष्ठानमध्ये अध्यक्ष, सदस्य, पदसिध्द सदस्य याबाबत आदेशित केलेले असणे, परंतु दिनांक २४/१२/२०२१ ला नवीन परिपत्रकानुसार खनिज प्रतिष्ठान अंतर्गत नियामक परिषद व व्यवस्थापकीय समितीच्या संरचनेमध्ये बदल करण्याबाबत स्थगिती दिलेली असणे, त्यामुळे शासन आधी राजपत्रित अधिसूचना प्रकाशित करणे व पत्रानुसार स्थगिती देणे योग्य नसणे, खनिज प्रतिष्ठान अंतर्गत अनेक कामे प्रस्तावित असणे, सदर कामे करणे गरजेचे असणे, त्यामुळे तातडीने शासनाने दिलेली स्थगिती उठवून समितीची पुनर्रचना मंजूर करणेबाबत शासनाने करावयाची तातडीची व महत्वाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(६) **श्री.जयंत पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृह मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्याच्या सार्वभौम सभागृहात जादुटोणा कायदा पारीत होऊन दशक पूर्ण उलटुनही चंदननगर, पोलीस स्टेशन, पुणे यांनी सदरहू कायद्यास पुर्णपणे दुर्लक्षित केल्याची गंभीर बाब माहे जानेवारी २०२२ साली उघडकीस येणे, ससाणे वस्ती, महमद वाडी रोड, हडपसर, पुणे-२८ येथील एका विवाहित महिलेचा रू.३.०० लाखाचा हुंडा व मांत्रिक, तांत्रिक बाबींसाठी त्यांचे सासरकडील मंडळी अघोरी छळ करीत असून, त्यांना जीवे मारण्याचा देखील प्रयत्न करीत असणे, सदरहू महिलेवर अघोरी व तंत्रविद्येचे वापर करण्यात येत असणे, व त्यायोगे पैश्याचा पाऊस पाडणे, यासारख्या कृत्यात त्यांना जीवे मारण्याचा धाक दाखवून मानसिक व शारीरिक छळ करण्यात येणे, सासरकडील नातेवाईकांच्या अशा कृत्यांमुळे सदरील महिलेचा हुंड्यासाठी सातत्याने छळ होत असणे व त्यांच्या जिवीताला धोका

अस्त्रापित प्रत

निर्माण झाला असणे, सदरील महिलेचे पती यांनी अनेक वेळा वेगवेगळ्या स्त्रियांशी विवाह केल्याची धक्कादायक बाब निदर्शनास येणे, याबाबत सदरील महिलेने दिनांक १३ फेब्रुवारी, २०२२ रोजी चंदननगर, पोलीस स्टेशन, पुणे या पोलीस स्टेशनला सविस्तर तक्रार दिलेली असणे, या महिलेच्या पतीचे चंदननगर पोलीस स्थानकाचे प्रभारी पोलीस निरीक्षक यांचेशी मैत्रीचे व व्यवसायीक संबंध असणे, सदर बाबतीत तातडीने कार्यवाही करणेबाबत लोकप्रतिनिधीनी शासनाला अनेक पत्र लिहूनही अद्याप त्यावर कोणतीही कारवाई झालेली नसणे, सबब सदर आरोपीवर कारवाई झालेली नसल्याने अद्यापही गुन्ह्याची नोंद न होणे, सदर विवाहितेच्या जिवीतास धोका निर्माण झालेला असणे, परिणामी जनतेमध्ये शासनाविरोधात तीव्र असंतोष निर्माण झालेला असणे, सबब शासनाने सदर प्रकरणाची तातडीने चौकशी करून सर्व संबंधितांवर तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता."

(७) **श्री.राजेश राठोड**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात विदर्भात १२३, मराठवाडयात ५५ व उर्वरित महाराष्ट्रात १३५ अशा एकूण ३१३ सिंचन प्रकल्पांची कामे सुरु करुन अनेक वर्षांचा लोटलेला कालावधी, निधीची उपलब्धता न झाल्यामुळे सदर सिंचन प्रकल्प गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेले असणे, आता सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सुमारे एक लाख नऊ हजार कोटी रुपये एवढया निधीची आवश्यकता असणे, या सिंचन प्रकल्पांवर झालेला कोट्यवधी रुपयांचा खर्च वाया जाऊ नये व खर्चात आणखी वाढ होऊ नये, तसेच राज्यातील सिंचनाचा प्रश्न लवकर सुटावा यासाठी हे रखडलेले ३१३ प्रकल्प पूर्ण करण्याकरिता प्राधान्यक्रम आणि कालमर्यादा निश्चित करण्याची आवश्यकता असणे, तसेच यासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करण्याची गरज, मात्र त्यादृष्टीने प्रयत्न होत नसल्याचे दिसून येत असणे, परिणामी प्रकल्पांवर व सिंचनावर होणारा गंभीर परिणाम, यामुळे शेतकरी वर्गात निर्माण होत असलेले चिंतेचे वातावरण यामुळे शासनाने सिंचन प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया."

(८) **श्री.वसंत खंडेलवाल, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अकोला शहर वाढीव पाणी पुरवठा योजनेकरीता वान

अस्वीकृत प्रत

प्रकल्पातुन २४ दलघमी पाणी पिण्याच्या पाण्याकरीता आरक्षित करण्यात आले असणे, सदरबाबतच्या शासन निर्णयास स्थगिती देण्यात येणे, केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेअंतर्गत अकोला वाढीव पाणी पुरवठा योजना टप्पा-१ ची कामे अंतिम टप्प्यात असुन टप्पा-२ करीता अकोला शहराला अतिरीक्त पाण्याची गरज लक्षात घेता DPR तयार करतेवेळी उद्भव निश्चीती आवश्यक असणे, सद्याची लोकसंख्या पाहता काटेपुर्णा प्रकल्पातुन आरक्षित असलेले पाणी कमी पडत असल्याने वान प्रकल्पामधुन पाणी आरक्षित करणे आवश्यक असणे, अकोला जिल्ह्यात वान प्रकल्प वगळता अकोला शहराकरीता पर्यायी कुठलाही शाश्वत उद्भव उपलब्ध नसणे, तसेच नियमित पाणी पुरवठा करणेकरीता अतिरीक्त पाणी आवश्यक असणे, वान प्रकल्पामध्ये दरवर्षीचे उन्हाळयामध्ये ३० ते ४० टक्के पाणी शिल्लक राहत असल्याने अकोला शहरास वान प्रकल्पातुन पाणी आरक्षित केल्यास शहराचा वाढता विस्तार पाहता लोकसंख्येनुसार भविष्यात अकोला शहराची पाण्याची आवश्यकता पाहता वान प्रकल्पातून पाणी आरक्षित करणे योग्य ठरणार असणे, वान प्रकल्पातुन पाणी उचल केल्यास आवश्यक असलेल्या विजेच्या खर्चात देखील संभाव्य बचत होणार असणे, अमृत २ करीता शहराच्या विस्तारासाठी पाणी पुरवठा योजना तयार करण्यासाठी निश्चित उद्भव आवश्यक असणे, शासन निर्णयानुसार अकोला शहरात वाढीव पाणी पुरवठा योजनेकरीता वान प्रकल्पातुन २४ दलघमी पिण्याचे पाणी आरक्षित केलेले पाणी व दिलेल्या स्थगितीबाबत पुनर्विचार करुन अकोला शहराचा वाढलेला विस्तार पाहता वान प्रकल्पामध्ये कायमस्वरुपी पाणी आरक्षित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(९) **श्री.रविंद्र फाटक, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मौजे वडवली, ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथील सर्वे नं. ४१ या शासनाच्या जमिनीवरील १८ एकर जागेत शिवाजी नगर रहिवाशी संघ असून स्थानिक रहिवाशी हे सन १९७७-७८ पासून या ठिकाणी वास्तव्यास असणे, या रहिवाश्यांनी शासकीय जमिनीवर अतिक्रमण केले असल्याने राहत्या घरांची अतिक्रमणे नियामानुकुल करण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असणे, या जागेवर वास्तव्यास असलेल्या रहिवाश्यांनी अतिक्रमणे नियमानुकूल करण्यासंदर्भात सबळ पुरावे जिल्हाधिकारी

अप्रकाशित प्रत

कार्यालय, ठाणे व तहसिलदार कार्यालय, अंबरनाथ यांच्याकडे सादर केलेले असणे, तसेच सदर अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत तत्कालीन महसूल राज्यमंत्री यांच्या दालनात बैठक देखील घेण्यात आलेली असणे, परंतु, या बैठकीच्या व स्थानिक रहिवाश्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या अनुषंगाने सदर अतिक्रमणे नियामानुकुल करण्याबाबत अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही शासन स्तरावर करण्यात आलेली नसल्याने स्थानिक रहिवाश्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, सदर अतिक्रमण नियमित करण्याकरिता शासनाकडून कार्यवाही होण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(१०) **सर्वश्री नागोराव गाणार,** प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री विजय ऊर्फ भाई गिरकर, रामदास आंबटकर, चंद्रशेखर बावनकुळे, प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके, सर्वश्री रमेशदादा पाटील, रमेश कराड, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सीबीएसई संलग्नित शाळेतील सुमारे १ लाखापेक्षा जास्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सेवा संरक्षित करणारा कायदा करणे व शाळा न्यायाधिकरण गठीत करणे या मागण्यांसाठी सीबीएसई स्कूल स्टाफ वेलफेअर असोसिएशन या संघटनेने "जन आंदोलनाची" सूचना शासनाला दिलेली असणे, तसेच कायदा व नियमाचे संरक्षण नसलेले एक लाखापेक्षा जास्त शिक्षक/कर्मचारी विद्यार्थ्यांचे भविष्य व भवितव्य घडविण्याचे कार्य प्रामाणिकपणे करीत असणे, शिक्षक/कर्मचाऱ्यांच्या सेवांचे निर्धारण करणारा कायदा व नियम अस्तित्वात नसून ही बाब भारतीय राज्यघटनेशी विसंगत असणे, ही बाब आर.टी.ई. कायद्याचे उल्लंघन करणारी असणे, आर.टी.ई. कायदा २००९ नुसार इयत्ता १ ते ८ वी च्या वर्गाला शासनाने निश्चित केलेला अभ्यासक्रम राबविण्याचे बंधन असताना खाजगी संस्थानी प्रकाशित केलेला अभ्यासक्रम राबवून पैसा उकळण्याचा गोरखधंदा सुरु असणे, सीबीएसई बोर्डाचे कार्यक्षेत्र इयत्ता ९ ते १२ चा अभ्यासक्रम निर्धारित करणे व परीक्षा घेणे यापुरतेच मर्यादित असणे, त्यामुळे सीबीएसई संलग्नित शाळेतील सुमारे १ लाखापेक्षा जास्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सेवा संरक्षित करणारा कायदा करणे. यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

(११) **सर्वश्री प्रविण दरेकर,** विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके,

अस्वीकृत

सर्वश्री सुरेश धस, सदाशिव खोत, प्रसाद लाड, गोपिचंद पडळकर, डॉ.रणजित पाटील, सर्वश्री निलय नाईक, प्रवीण दटके, रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री चंदूभाई पटेल, नागोराव गाणार, विनायकराव मेटे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृहनिर्माण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईमधील अनेक झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन प्रकल्प हे मालकी हक्काच्या अनुषंगाने रखडलेले असणे, विशेषत: खाजगी मालकीच्या जमिनी, तसेच धर्मादाय संस्था, शासन नियंत्रित कल्याणकारी संस्था यांच्या मालकीच्या जमिनीवरील प्रकल्प राबविताना असंख्य अडचणी येत असणे, या धर्मादाय संस्था, लोककल्याणकारी संस्था यांना विशिष्ट उद्देशपुर्तीसाठी काही खाजगी जमीन मालकांकडून जमिनी या दान स्वरूपात मिळालेल्या असणे, तर काही वेळेस शासनाकडून जमिनी वाटप केलेल्या असणे, यासंस्थेचे संचालन/व्यवस्थापन हे काही लोकांच्या विश्वस्त समित्या, तर काहींच्या शासन नियुक्त प्रतिनिधी तर काही शासनाच्या विविध खात्यांमार्फत चालविले जाणे, या जमिनींवरील प्रकल्प राबविण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांच्या नियमानुसार संबंधित जमीन धारकांकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करावे लागणे, सदर संस्था अशा प्रकारे ना-हरकत प्रमाणपत्र न देता उलटपक्षी कोर्टात जाऊन पुनर्वसनासाठी त्या प्रकल्पास विरोध करीत असल्याचे निदर्शनास येणे, कायद्यानुसार पात्र झोपडपट्टीधारकांना आहे त्याच ठिकाणी पुनर्वसित करण्याचे धोरण असणे, त्याशिवाय दुसरा पर्याय नसेल तर त्यांना ना-हरकत प्रमाणपत्रासाठी का बाध्य केले जात असणे, असे प्रमाणपत्र प्राप्त करण्याची अट टाकून प्रकल्पाचा विलंब करण्यासाठीचे कारण निर्माण केले जात असणे, जसे शासकीय, निमशासकीय जमिनींवर प्रकल्प राबविताना जमिनीच्या रेडीरेकनरनुसार येणाऱ्या किंमतींच्या २५ टक्के रक्कम प्रिमियम म्हणून घेण्याचे असलेले धोरण अशा धर्मादाय संस्था, शासन नियंत्रित कल्याणकारी संस्था यांच्याकरीता लागू नसणे, यासाठी हवे असेल तर २५ टक्के पेक्षा जास्त प्रिमियमची आकारणी करण्याबाबत विचार करण्याची आवश्यकता असणे, जर पात्र झोपडपट्टीधारकांना कायद्यानुसार संरक्षण दिले गेले तर अशा प्रकारे प्रिमियमची आकारणी करून ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे अधिकार स्थानिक जिल्हाधिकारी अथवा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास देण्यास कोणतीही अडचण नसणे, जर प्रिमियमची आकारणी होत

असेल तर ना-हरकत प्रमाणपत्राची सक्ती रद्द करणे आवश्यक असणे, मालकी हक्काच्या संबंधाने पात्र प्रकल्प रखडले जाणार नाहीत याकरीता शासनाने त्वरित करावयाची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया."

(१२) **श्री.राजहंस सिंह**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **नगरविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई महापालिकेने सन २०१४ मध्ये मागविलेल्या अर्जाला ९९ हजार फेरीवाल्यांनी अर्ज केला असणे, यासाठी नियुक्त समितीमध्ये लोकप्रतिनिधींचा समावेश करण्याबाबत राज्य सरकारकडे अभिप्राय मागण्यात आला असणे, मात्र मुंबईत प्रत्यक्षात दोन लाखांहुन अधिक फेरीवाले असले तरी यापैकी केवळ १५ हजार ३६१ पात्र फेरीवाल्यांना प्रमाणपत्र देण्यास मान्यता दिली असणे, फेरीवाल्यांचे पुनर्वसन करण्यासाठी केंद्र शासनाने १ मे २०१४ रोजी पथविक्रेता अधिनियम २०१४ प्रसिध्द केले असणे, त्यानुसार राज्य शासनाने महाराष्ट्र पथ विक्रेता नियम २०१६, पथविक्रेता महाराष्ट्र योजना २०१७ प्रसिध्द केली असणे, पालिकेने फेरीवाल्यांची पहिली पात्रता यादी जाहीर करीत फेरीवाला क्षेत्रही तयार केले असणे,हे धोरण अंमलात आणण्यासाठी नियुक्त फेरीवाला समितीत नगरसेवक, लोकप्रतिनिधींचा समावेश करण्याचा ठराव महासभेत मंजूर करीत अभिप्रायासाठी राज्य सरकारकडे पाठविला असणे,परंतु त्यावर अद्यापर्यंत उत्तर आले नसणे, त्यामुळे अभिप्राय आल्यानंतरच अधिनियमांची अंमलबजावणी करुन पथविक्रेत्यांना प्रमाणपत्र देण्यात येतील असे प्रशासनाने स्पष्ट केले असणे, मा.न्यायालयाच्या निर्देशानुसार लोकसंख्येच्या दोन टक्के फेरीवाल्यांना परवानगी असणे, यानुसार मुंबईत दोन लाख फेरीवाल्यांचे पुनर्वसन होऊ शकत असणे, मात्र विभाग कार्यालयामार्फत आलेल्या हरकती-सूचनांनुसार मुंबईतील ४०४ रस्त्यांवर ३० हजार ८३२ ओटे निश्चित करण्यात आले असणे, फेरीवाल्यांचे पुनर्वसन करण्याबाबत तसेच फेरीवाला धोरण लवकरात लवकर ठरविण्याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना तसेच शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१३) **ॲड.निरंजन डावखरे,** श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, सर्वश्री प्रसाद लाड, नागोराव गाणार, डॉ.रणजित पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

अप्रकाशित

"मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत तब्बल १७८ महाविद्यालये ही विना प्राचार्य असून प्रभारींच्या सहाय्याने येथील कारभार सुरू असल्याचे जानेवारी २०२२ मध्ये निदर्शनास येणे, मुंबई विद्यापीठाच्या महाविद्यालयीन शिक्षक मान्यता कक्षाने ३८ पानांची यादी दिली असून या यादीत एकूण ८०८ महाविद्यालयांची नोंद असून यापैकी ८१ महाविद्यालयात प्राचार्याऐवजी संचालक हे पद अस्तित्वात असल्याचे नमूद आहे तर उरलेल्या ७२७ पैकी १७८ महाविद्यालयांमध्ये कायमस्वरूपी प्राचार्यांची नियुक्तीच झालेली नसणे, तर २३ महाविद्यालयांची माहितीच विद्यापीठाच्या अभिलेखावर उपलब्ध नसल्याचेही उघड होणे, प्राचार्यांची निवड झाली नसल्याने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये पसरलेला असंतोष, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने तातडीने प्राचार्यांची रिक्त पदे भरण्याबाबत करावयाची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया."

**(१४) श्री.सतिश चव्हाण,** विक्रम काळे, अमरनाथ राजूरकर **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मराठवाडयातील मका पिकाच्या वाढत्या क्षेत्रामुळे संशोधनाच्या दृष्टीकोनातून गल्लेबोरगाव येथे मका संशोधन केंद्र सुरु करण्याचा प्रस्ताव १० वर्षापूर्वी वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ, परभणी यांनी शासनाकडे सादर केला असणे, औरंगाबाद व जालना जिल्ह्यात गेल्या काही वर्षापासून मका पिकाच्या क्षेत्रात प्रचंड वाढ झाली असून यावर्षी किमान २ लाख हेक्टर क्षेत्रावर शेतकऱ्यांनी मका पिकाची लागवड केली असणे, शेतकऱ्यांना एकरी सरासरी ३० क्विंटल उत्पन्न अपेक्षित असणे, परंतू किड व लष्करी अळीच्या प्रादुर्भावामुळे ५० टक्के उत्पादन घटणे, मका पिकाच्या संरक्षणासाठी तसेच पिकावर येणाऱ्या रोगाचे निदान व उपाययोजना करण्याचे दृष्टीकोनातून मका संशोधन प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव तयार केला असणे, गल्लेबोरगाव येथील कृषी विभागाच्या जमिनीवर ८ एकर जागा मका संशोधन प्रकल्पासाठी संमती मिळाली असणे, तत्कालीन गृहमंत्री दिवंगत आर.आर. पाटील यांनी या संदर्भात बैठक घेवून प्रकल्प तात्काळ मंजूर करण्याचे आदेश दिले असणे, मका संशोधन केंद्राची उभारणी झाल्यास मका पिकावरील रोग व किडीचा अभ्यास करुन त्यावर तात्काळ उपाय योजना झाल्यास किड/ अमेरिकन लष्कर अळीचा बंदोबस्त करण्यास मदत होणार असणे, १० वर्षापूर्वी

प्रकल्प उभा राहीला असता तर लष्करी अळीवर संशोधन होऊन मका पिके वाचविणेसाठी उपाय योजनांची सखोल माहिती शेतकऱ्यांना मिळून उत्पादनात वाढ होण्यास मदत होऊ शकली असणे, मौजे गल्लेबोरगांव येथील नियोजित मका संशोधन केंद्र तात्काळ सुरु करण्यासाठी होत असलेली मागणी यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(१५) **श्री.सदाशिव खोत, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या १८६ कोटी रुपये व्याजमाफी व राईट ऑफ योजना तयार करुन कर्जमाफ करण्याचा डाव असणे, १०० कोटीच्या व्याजमाफी योजनेमध्ये जिल्ह्यातील काही संस्था व कारखान्यांच्या वाहतूक यंत्रणेची कर्जे, व्याज माफ करण्याचा निर्णय घेणे, जिल्हा बँकेत वाढत चाललेल्या एनपीए खात्याची वसूली न होणे, एनपीए मध्ये बँकेने ताब्यात घेतलेल्या संस्था, पुन्हा कमी किंमतीत खरेदी करण्याचा प्रयत्न करणे, साखर कारखाने, सुत गिरण्या यांनी काढलेल्या हजारो कोटींच्या कर्जामुळे संस्था बंद पडणे व बँका तोट्यात येणे, सदर कर्जांना वन टाईप सेटलमेंट योजना लागू असणे, परंतु शेतकऱ्यांना मात्र सदर योजना लागू नसणे, शेतकऱ्यांची पिक कर्जे, मध्यम मुदत कर्जे, वाहन कर्जे थकली की जप्तीची कारवाई, ट्रॅक्टर ओढून नेण्याची कारवाई, कर्ज पुरवठा बंद करण्यात येणे, परंतु वरील संस्थांची कर्जे थकली की त्यांना चोर दरवाजाने कायद्याच्या पळवाटा काढून कर्ज देणे, सन २०१९-२०२० च्या महापुरामुळे व कोरोनामुळे बाजारपेठा उध्वस्त झाल्याने त्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याऐवजी बड्या नेत्यांना व संस्थांना दिलासा देणे, यामुळे शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रती नाराजी निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

(१६) **डॉ.सुधीर तांबे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्याच्या अहमदनगर जिल्ह्यातील राहता तालुक्यातून प्रवरा हि प्रमुख जलस्त्रोत असलेली नदी वहात असुन पुढे या नदीतील पाणी वाहून नाथसागर या प्रमुख जलाशयात मिळत असणे, राहता या क्षेत्रातील डॉ. वि. वि. पाटील सहकारी साखर कारखान्यांतून स्पॅट वॉश हा अनेक स्त्रोतामार्फत आणि बेकायदेशिरपणे ट्रक, टँकर च्या

माध्यमातुन प्रवरा नदीच्या पात्रात सोडल्याने, तसेच या क्षेत्रातील आसवानी प्रकल्प या उद्योगांनी देखील सांडपाणी प्रक्रिया न करता नदी पात्रात सोडल्याने नदी पात्रातील पाणी दुषित होणे, दुषित पाण्यामुळे नदी पात्रात मृत माशांचा व इतर जलचरांचा खच पडलेला असणे, मृत मासे व जलचर खाल्ल्याने अनेक जनावरे मृत्युमुखी पडणे या सारख्या कारणांमुळे नदीपात्रातील पाणी मोठ्या प्रमाणावर प्रदुषित झालेले असणे, अशा प्रदुषित पाण्याचा पाझर थेट शेतकरी यांच्या विंधन विहिरी यामध्ये येणे, त्यामुळे नदीपात्रा लगतच्या आणि आजुबाजूच्या गावांच्या पिण्याच्या आणि सिंचनाच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होणे, याबाबत स्थानिक नागरिकांनी डॉ. वि.वि.पाटील सहकारी साखर कारखाना आणि आसवानी प्रकल्पांच्या विरोधात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास माहे फेब्रुवारी, २०२१ च्या दरम्यान तक्रार करणे, प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नमुने तपासणीसाठी घेवून असे नमुने सदोष आढळुन येऊनही या क्षेत्रातील कारखान्यांस जुजबी दंड करणे, त्यामुळे त्या परिसरातील सदर कारखाना आणि आसवानी प्रकल्प या उद्योगांचे प्रक्रिया न केलेले सांडपाणी, स्पॅट वॉश नदी पात्रात सोडण्याच्या प्रवृत्तीला आळा न बसणे, येथील डॉ. वि.वि.पाटील सहकारी साखर कारखाना आणि आसवानी प्रकल्प यांच्याकडे दुषित पाणी आणि सांडपाणी यांच्यावर प्रक्रिया करण्याकरीता आवश्यक कोणतीही सक्षम व्यवस्था व त्याचे नियोजन नसणे, त्यामुळे प्रक्रिया विना सांडपाणी नदीपात्रात सोडण्याशिवाय अन्य पर्याय त्यांच्याकडे नसणे, याकारणांमुळे नदीपात्रातील पाण्याच्या प्रदूषणात सारखी भरच पडत राहणे, नदी परिसरातील गावांतील पिण्याच्या आणि सिंचनाच्या पाण्याचा प्रश्न अधिकच गंभीर होणे, त्यामुळे स्थानिक नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणे, कोव्हीड-१९ च्या जागतिक महामारीच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य नागरीक अडचणींच्या काळातून जात असताना त्याच्या अडचणीत आणखी भर पडणे, त्यामुळे त्रस्त स्थानिक नागरिकांनी डॉ. वि.वि.पाटील सहकारी साखर कारखाना आणि आसवानी प्रकल्प यांच्या विरोधात पुनःश्च माहे डिसेंबर, २०२१ च्या दरम्यान तसेच वारंवार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास तक्रार करणे, त्यावर याप्रकरणी उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी संबंधित ठिकाणी कोणतेही नमुने तपासणीसाठी न घेता, केवळ वरीष्ठ कार्यालयास स्थळ पाहणी अहवाल सादर केल्याने कडक कारवाई न होणे, त्यामुळे दरम्यानच्या

अप्रमाणित प्रत

कालावधीत कांही नागरिकांनी त्रस्त होवुन केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळास याबाबत तक्रार करणे, या तक्रारीस अनुसरुन केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास या प्रकरणी तपासणी करुन उचित कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले असणे, या सर्व पार्श्वभुमीवर राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने कायद्यानुसार कडक कारवाई करणे अपेक्षित असताना अद्याप कोणतीही कडक कारवाई न करणे, या परिसरातील स्थानिक नागरिकांना शासनाकडून मदतीची अपेक्षा असताना शासनाचे त्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी सर्वसामान्यांच्या मनात शासनाबद्दल निर्माण झालेला तीव्र असंतोष आणि घबराट, या घटनेमुळे स्थानिक सर्वसामान्य नागरिकांवर होत असलेला अन्याय, त्यामुळे या प्रकरणी शासनाने तातडीने हस्तक्षेप करुन केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**(ख) लक्षवेधी सूचनेवरील निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे. (जोडपत्र पहावे.)**

**सात : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास).**

**आठ : समिती सदस्य विधानपरिषद विशेषाधिकार समिती यांचा प्रस्ताव**

विधानपरिषद विशेषाधिकार समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या,

**(१)** सन्माननीय विधानपरिषद सदस्या प्रा.डॉ.मनीषा कायंदे तसेच तत्कालीन सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री. भाई जगताप यांनी श्री.अर्णब गोस्वामी, संपादक, वृत्त निवेदक व कार्यक्रम सूत्र संचालक रिपब्लिक टिव्ही वृत्तवाहिनी यांचेविरुध्द दिनांक ०८ सप्टेंबर, २०२० रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

**(२)** तत्कालीन सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री.भाई जगताप यांनी हिंदी सिने अभिनेत्री कंगना राणावत यांचेविरुद्ध दिनांक ०८ सप्टेंबर, २०२० रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

या दोन प्रकरणांवरील विशेषाधिकार समितीचे अहवाल सादर करण्याकरिता महाराष्ट्र विधानपरिषद नियम १७८ च्या पोट नियम (१) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.

अग्रिम प्रत

# - मध्यंतर -

नऊ : **(गुरुवार, दिनांक २४ मार्च, २०२२, रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २५९ अन्वये प्रस्ताव) — (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) —**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, सुरेश धस, सदाशिव खोत, गोपिचंद पडळकर, विनायक मेटे, डॉ.रणजित पाटील सर्वश्री प्रविण पोटे पाटील, महादेव जानकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री निलय नाईक, चंदुभाई पटेल, प्रविण दटके, रमेशदादा पाटील, नागोराव गाणार, राजहंस सिंह, रामदास आंबटकर, रमेश कराड, अमरीशभाई पटेल, रामराव पाटील, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव —**

"मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील अनेक मोठ्या व जनउपयोगी प्रकल्पांचे काम कासवगतीने सुरु असणे, वाहतुकीचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, मुंबई महानगरपालिकेच्या मेगा प्रोजेक्टमध्ये तसेच कोरोना उपाययोजना कामात उघडकीस आलेली भ्रष्टाचाराची प्रकरणे, पुनर्विकास प्रकल्पांची प्रलंबित कामे, मुंबई महानगरपालिकेने सन २००५ ते २०२२ या १७ वर्षांच्या काळात रुपये ३ लाख ५२ हजार ९९० कोटी एवढी अवाढव्य रक्कम खर्च करुनही मुंबईच्या समस्या सोडवण्यात व मुंबईकरांना किमान सुविधा पुरवण्यात महानगरपालिकेला आलेले प्रचंड अपयश, मालमत्ता करात सूट देण्याबाबत मुंबईकरांची झालेली घोर फसवणूक, मुंबईतील मराठी शाळांत व पटसंख्येत कमालीची झालेली घसरण, मुंबई महानगरपालिकेकडून अनधिकृत बांधकामे पाठीशी घातली जात असल्यामुळे अनधिकृत बांधकामांचे फुटलेले पेव, मिठी नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचा दुसरा टप्पा २०१९ मध्ये सुरु होऊनही दोन वर्षात एक टक्काही काम झालेले नसणे, मुंबई महानगराची शान असलेल्या बेस्टचे खाजगीकरण करण्याचा घालण्यात आलेला घाट, मुंबई महानगरपालिकेच्या विविध कामातील कोट्यवधींचे गैरव्यवहार निदर्शनास येऊन देखील चौकशी न करण्याच्या सरकारच्या आडमुठ्या धोरणामुळे भ्रष्टाचाऱ्यांना मिळत असलेले प्रोत्साहन, मुंबईच्या विविध समस्यांनी धारण केलेले उग्र स्वरुप, ठाणे स्मार्ट सिटी प्रकल्पात झालेल्या अनियमिततेची तातडीने चौकशी पूर्ण करण्याची होत असलेली मागणी, तसेच महसूल विभागाच्या मुद्रांक शुल्क वसुलीत झालेला गैरव्यवहार निदर्शनास येऊन देखील दोषींवर कारवाई करण्यात होत असलेली दिरंगाई, आदिवासी समाजाच्या मालमत्ता विक्रीबाबत लावण्यात आलेले कठोर निर्बंध शिथिल करण्याची होत असलेली मागणी, महामार्गांसाठी लागणाऱ्या जमिनी भूसंपादन करताना झालेला भ्रष्टाचार, शासकीय जमिनी भाडेपट्टा व कब्जेहक्काने प्रदान केल्यानंतर दिलेल्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी होत असलेला

अशुध्दित प्रत

वापर, करारनाम्यांची ऑनलाईन नोंदणी करण्याबाबतचे सॉफ्टवेअर कार्यरत असतानाही राज्यातील उपनिबंधक, नोंदणी कार्यालयांकडून आर्थिक फायद्यासाठी ऑनलाईन सेवेला दिलेला फाटा, क्षेत्रीय वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांच्या बदल्या करताना शासनाने बदलीच्या कायद्याचा केलेला भंग, तसेच पर्यटन उद्योगावर अवलंबून असणाऱ्यांना टाळेबंदीत मदतीचा हात न दिल्यामुळे या क्षेत्राला बसलेला फटका, कोकण व राज्यातील पर्यटन विकासाकडे सरकारचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, महालक्ष्मी येथील रेसकोर्सवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे थीम पार्क उभारण्याची घोषणा करुनही प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली नसणे, अर्थसंकल्पात वरळी डेअरीच्या जागेवर पर्यटन केंद्र आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे मत्स्यालय उभारण्याची घोषणा करुनही अद्याप तांत्रिक बाबीही पूर्ण केल्या गेलेल्या नसणे, राज्यातील अनेक भागात प्रदूषणात झालेली वाढ, मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी रखडल्याने वाहनांमधून होणाऱ्या प्रदूषणाने गाठलेला उच्चांक, हवामान बदलाबाबत अभ्यासक्रम विकसित करण्याची घोषणा झाली असली तरी दोन वर्षात कोणतीही प्रगती झालेली नसणे, लोकप्रतिनिधी व स्थानिकांना विश्वासात न घेता डोंबिवली एमआयडीसीमधील १५६ कारखान्यांचे स्थलांतर करण्याचा एकतर्फी घेतलेला निर्णय, एकूणच नागरी व अन्य समस्यांबाबत सरकार गंभीर नसल्यामुळे कोट्यवधी जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**दहा** : **(मंगळवार, दिनांक २२ मार्च, २०२२, बुधवार, दिनांक २३ मार्च, २०२२ व गुरुवार, दिनांक २४ मार्च, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**श्री.दिवाकर रावते,** डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री शशिकांत शिंदे, विलास पोतनीस, अमरनाथ राजूरकर, विक्रम काळे, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री मोहनराव कदम, सतीश चव्हाण, सुनिल शिंदे, डॉ.वजाहत मिर्झा, सर्वश्री अनिकेत तटकरे, रविंद्र फाटक, राजेश राठोड, अमोल मिटकरी, नरेंद्र दराडे, अभिजित वंजारी, संजय दौंड, विप्लव बाजोरिया, जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री अंबादास दानवे, दुष्यंत चतुर्वेदी, किशोर दराडे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"मुंबईतील बऱ्याच इमारती ५० वर्षापेक्षा जास्त जुन्या झाल्यामुळे सदर इमारतींचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, मुंबईतील हवाईमार्गात (फनेल झोन) येणाऱ्या विमानतळाच्या परिसरातील इमारतींना उंचीची मर्यादा असणे, त्यामुळे या इमारतींचा विकास व पुनर्विकास आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य असणे, मुंबई महापालिकेने सदर इमारतींचा नमूना गणनेच्या आधारे पुनर्विकास करण्यासाठी नगरविकास विभागाने योग्य निर्णय घेण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिका हद्दीत भोगवटा प्रमाणपत्र नसलेल्या व वर्षानुवर्षे प्रतिक्षेत असलेल्या इमारतींचा भोगवटा प्रमाणपत्रांबाबत "क्षमापित" निर्णय घेणे व मध्यम वर्गीय नागरीकांना दिलासा देणे, राज्यातील शहरांमधील एसआरए सक्षम प्राधिकाऱ्याने झोपडीधारकांची पात्रता ९० दिवसात

प्रक्रिया पूर्ण करण्याची आवश्यकता, मुंबई उपनगर, ठाणे व पुणे जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिक तसेच सहकारी गृहनिर्माण संस्था अन्य वेगवेगळ्या संस्थांना सन १९९६ पासून २०२१ पर्यंत २५ वर्षाचा कालावधीच्या एकत्रित अकृषिक आकारणीच्या नोटीसा देण्यात येणे, सदर नोटीसांमधील अकृषिक आकारणीचे प्रमाणदर अवाजवी असणे, सदर रक्कम भरण्यासाठी देण्यात आलेला अल्प कालावधी, सदर रक्कम न भरल्यास संबंधितांची बँक खाती/कार्यालये सील करणे, कोविड-१९ जागतिक महामारीच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य नागरीक/ व्यावसायिक अडचणीच्या काळात जात असतांना शासनाकडून या अकृषिक आकारणीमध्ये मदतीची अपेक्षा, पी.एम.जी.पी. प्रकल्पांतर्गत शासनाच्या, खाजगी जमिनीवरील व म्हाडाच्या ५६ वसाहतीमधील सोसायट्यांना लावण्यात आलेला व्याजासहीत एन.ए.टॅक्स रद्द करण्याबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता, म्हाडाच्या थकीत सेवा शुल्काबाबत उपाययोजना जाहीर करणे, तालुका तेथे म्हाडा प्रकल्पाची आवश्यकता, पुणे येथील जुन्या व जीर्ण झालेल्या म्हाडा इमारतींच्या पुनर्विकासाची आवश्यकता, राज्यभरातील जमिनीवरील म्हाडाचे असलेले आरक्षण व त्या जमिनींचा विकास व पुनर्विकास, म्हाडामार्फत नोकरदार महिलांसाठी वसतीगृह व मुलां-मुलींकरीता वसतीगृह बांधण्याबाबत कार्यवाही, पश्चिम उपनगरात आरक्षित भूखंडावर म्हाडामार्फत मोठ्या रुग्णालयांची उभारणी, मुंबईतील वांद्रे (पश्चिम) येथे म्हाडाच्या जागेवर पशुवैद्यकीय दवाखान्यांची उभारणी, शासकीय जमिनींवर असलेल्या गृहनिर्माण सोसायट्यांच्या इमारतींचा पुनर्विकास म्हाडामार्फत करण्याचा पर्याय उपलब्ध करण्याबाबत, प्रलंबित असलेल्या झोपडपट्ट्यांचा विकास करण्यासाठी ॲमनेस्टी स्किम त्वरीत अंमलात आणण्याची आवश्यकता, केंद्र शासनाच्या जागेवर असलेला झोपडपट्ट्यांचा प्रलंबित पुनर्विकास, एसआरए योजना संपूर्ण महाराष्ट्राला लागू करणे, धारावी झोपडपट्टी व बीडीडी चाळींचा पुनर्विकास करणे, याबाबत करावयाची निर्णयात्मक कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

अप्रकाशित प्रत

## — अशासकीय कामकाज —
## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

**अकरा : अशासकीय विधेयके —**

**(क) पुर:स्थापनार्थ -**

"सन २०२२ चे वि.प.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२२" - श्री.प्रविण दरेकर, वि.प.स. यांचे

---

**(ख) विचारार्थ -**

**(१)** "सन २०२० चे वि.प.वि. क्रमांक २ - डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२०" - श्री.नागोराव गाणार, वि.प.स. यांचे

**(२)** "सन २०१९ चे वि.प.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र शैक्षणिक परिसंस्था (व्यवस्थापन) (सुधारणा) विधेयक, २०१९" - श्री.नागोराव गाणार, वि.प.स. यांचे

**(३)** "सन २०२१ चे वि.प.वि. क्रमांक ७ - महाराष्ट्र धर्म द्वेषास आणि प्रेषित, पैगंबर व धर्मस्थाने यांची विडंबना करण्यास प्रतिबंध करण्यास विधेयक, २०२१" - श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांचे

---

## "राष्ट्रगीत."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २४ मार्च, २०२२.

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

असुधारित प्रत